# ९. औक्षण

**इंदिरा संत** (१९१४ ते २०००) :

सुप्रसिद्ध कवयित्री, कथाकार, ललित लेखिका. विशुद्ध भावकविता लिहिणारी कवयित्री म्हणून तत्कालीन समीक्षकांनी इंदिरा बाईंच्या कवितेला मुक्त दाद दिली. प्रीती, विरह, एकाकीपणाचे दुःख आणि भावनांचा कल्लोळ निसर्गप्रतिमांतून भावोत्कटतेने आणि नेमक्या शब्दांमधून अभिव्यक्त करण्याची शैली हे त्यांच्या काव्याचे वैशिष्ट्य होय. त्यांचे 'मेंदी', 'मृगजळ', 'रंगबावरी', 'बाहुल्या', 'गर्भरेशीम', 'चित्कळा', 'वंशकुसुम' आणि 'निराकार' हे कवितासंग्रह; 'श्यामली', 'कदली', 'चैतु' हे कथासंग्रह असे विपुल लेखन प्रसिद्ध आहे. त्यांच्या 'गर्भरेशीम' या कवितासंग्रहाला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळालेला आहे.

सीमेवर लढायला जाण्यासाठी सुसज्ज झालेल्या जवानाला साऱ्या देशवासीयांकडून केले जाणारे हे औक्षण आहे. औक्षण करताना मनात येणाऱ्या विविध भावनांचे वर्णन कवयित्रीने प्रस्तुत कवितेतून व्यक्त केले आहे.

नाही मुठीमधे द्रव्य
        नाही शिरेमध्ये रक्त,
काय करावें कळेना
        नाही कष्टाचे सामर्थ्य;

जीव ओवाळावा तरी
        जीव किती हा लहान;
तुझ्या शौर्यगाथेपुढे
        त्याची केवढीशी शान;

वर घोंघावे बंबारा,
        पुढे कल्लोळ धुराचे,
धडाडत्या तोफांतून
        तुझें पाऊल जिद्दीचें;

तुझी विजयाची दौड
        डोळे भरून पहावी;
डोळ्यांतील आसवांची
        ज्योत ज्योत पाजळावी

अशा असंख्य ज्योतींची
        तुझ्यामागून राखण;
दीनदुबळ्यांचे असें
        तुला एकच औक्षण.



(इंदिरा संत यांची समग्र कविता)

**शब्दार्थ :**

**औक्षण** – ओवाळणे.
**द्रव्य** – धन, पैसा, संपत्ती.
**बंबारा** –बंदुकीच्या गोळ्यांचा/तोफगोळ्यांचा भडिमार.
**कल्लोळ** – लोळ.
**पाजळणे** – पेटवणे, चेतवणे.

## कृती

**(१) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) कष्टाचे सामर्थ्य अपुरे केव्हा वाटते?
(आ) सैनिकाचे पाऊल जिद्दीचे का वाटते?
(इ) डोळे भरून पाहावे असे दृश्य कोणते?

**(२) योग्य पर्याय निवडा.**

(अ) सैनिकाचे औक्षण केले जाते.....
 (१) भरलेल्या डोळ्यांनी/भरलेल्या अंत:करणाने
 (२) डोळ्यांतील आसवांच्या ज्योतींनी
 (३) तबकातील निरांजनाने
 (४) भाकरीच्या तुकड्याने

(आ) कवितेतील 'दीनदुबळे' म्हणजे .....
 (१) कष्टाचे, पैसे नसलेले.
 (२) सैनिकाबरोबर लढणारे.
 (३) शारीरिकदृष्ट्या सक्षम नसलेले.
 (४) सैनिकांच्या कार्याचा अभिमान बाळगणारे देशवासीय.

**(३) काव्यसौंदर्य.**

(अ) खालील ओळींचे रसग्रहण करा.

'अशा असंख्य ज्योतींची
  तुझ्यामागून राखण;
दीनदुबळ्यांचे असें
  तुला एकच औक्षण.'

(आ) 'सैनिक सीमेवर तैनात असतो, म्हणून आपण सुरक्षित राहतो', या विधानातील भाव स्पष्ट करा.
(इ) कवितेच्या संदर्भात 'दीनदुबळे' याचा कवयित्रीला अभिप्रेत असलेला अर्थ स्पष्ट करा.
(ई) 'देशसेवा हीच ईश्वरसेवा' असे समजून कार्य करणाऱ्या सैनिकांसाठी तुम्हांला काय करावेसे वाटते ते लिहा.

**उपक्रम :**

(१) सैनिकाची मुलाखत घेण्यासाठी दहा प्रश्न तयार करा.
(२) एखाद्या माजी सैनिकाची मुलाखत घेऊन त्याचे अनुभव जाणून घ्या.
(३) 'सैनिक' या विषयावरील गीतांचे संकलन करून त्यांचा संग्रह करा.

## भाषाभ्यास

रस म्हणजे चव किंवा रुची. आपण गोड, कडू, आंबट, तिखट, तुरट, खारट अशा सहा प्रकारच्या चवी अनुभवतो. त्याचप्रमाणे काव्याचा आस्वाद घेताना वेगवेगळे रस आपण अनुभवतो. त्यातील भावनांमुळे साधारणपणे नऊ प्रकारचे रस आपल्याला दैनंदिन जीवनात आणि साहित्यात अनुभवायला मिळतात.

| | |
|---|---|
| **करुण** | शोक, दु:ख, वियोग, दैन्य, क्लेशदायक घटना. |
| **शृंगार** | स्त्री-पुरुषांना एकमेकांविषयी वाटणाऱ्या आकर्षणाचे, प्रेमाचे, भेटीची तळमळ, विरह, व्याकुळ मन. |
| **वीर** | पराक्रम, शौर्य, धाडस, लढाऊ वृत्ती. |
| **हास्य** | विसंगती, विडंबन, असंबद्ध घटना, चेष्टा-मस्करी. |
| **रौद्र** | क्रोधाची तीव्र भावना, निसर्गाचे प्रलयकारी रूप. |
| **भयानक** | भयानक वर्णने, भीतिदायक वर्णने, मृत्यू, भूतप्रेत, स्मशान, हत्या. |
| **बीभत्स** | किळस, तिरस्कार जागृत करणाऱ्या भावना. |
| **अद्‌भुत** | अद्‌भुतरम्य, विस्मयजनक, आश्चर्यकारक भावना. |
| **शांत** | भक्तिभाव व शांत स्वरूपातील निसर्गाचे वर्णन. |

रस ही संकल्पना संस्कृत साहित्यातून आलेली आहे. ती शिकवताना प्रामुख्याने कवितांची उदाहरणे दिली जातात. याचा अर्थ रस फक्त काव्यातच असतो असे नाही तर तो सर्व प्रकारच्या साहित्यात असतो. तसेच कधी कधी या नऊ रसांव्यतिरिक्त अनेक वेगवेगळ्या प्रकारच्या भावभावनाही असू शकतात. कोणत्याही साहित्यामध्ये एक किंवा अधिक रस असू शकतात. कवितेतील रस हा विशिष्ट शब्दांत नसतो. उदाहरणार्थ, कवितेत 'वीर' हा शब्द आला म्हणजे त्या कवितेत वीररस असेलच असे नाही. तसेच 'हुंदका' शब्द आला म्हणजे तिथे करुण रस असेलच असे नाही.

❖ ❖ ❖

9YH8NP